सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २८ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पाकिस्तानला तुर्कीची रसद! बायरकतार ड्रोनसह सहा विमाने भरून शस्त्रास्त्रे कराचीला पोहोचली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८ कराची

भारताने कितीही मदत केली तरी तुर्कस्तान हा पाकिस्तानच्याच बाजुने उभा ठाकला आहे. भारताविरोधात लढण्यासाठी तुर्कीने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर लष्करी शस्त्रसामुग्री पाठविली आहे. तुर्कीच्या लष्कराचे एअर फोर्स सी १३० हे मालवाहू हर्क्युलिस विमान रविवारी कराची विमानतळावर उतरले आहे.



या विमानामध्ये तुर्कीचा धोकादायक ड्रोन बायरकतार आणि अन्य शस्त्रास्त्रे आहेत. भारताविरोधात लढण्यासाठी तुर्की पाकिस्तानला मोठी लष्करी मदत करत आहे. या दोन्ही देशांनी एकमेकांना लष्करी मदत करण्याचे आश्वासन दिले होते. यानुसार ही मदत केली जात आहे.

तुर्कीने एक-दोन नव्हे तर सहा मालवाहू विमाने पाकिस्तानला पाठविली आहेत. ही विमाने इस्लामाबाद विमानतळावरही उतरविण्यात आली आहेत. तुर्कीच्या मदतीने पाकिस्तान भारताला एलओसीवर टक्कर देणार आहे. पाकिस्तानी आणि तुर्कीच्या सुत्रांनी मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे पाठविण्यात आल्याचे सांगितले आहे. परंतू, त्यात काय काय आहे हे मात्र त्यांना सांगितलेले नाही.


पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर आणि काश्मीरवरून भारत-पाकिस्तान संघर्षानंतर, तुर्की पाकिस्तानच्या पाठीशी उभा राहिला आहे. वेळोवेळी तुर्कीने पाकिस्तानची बाजू घेतलेली आहे. तरीही भारत नेहमी तुर्कीची मदत करत आला आहे. तुर्की, पाकिस्तान आणि चीनमधील वाढत्या संरक्षण संबंधांवर यामुळे प्रकाश टाकला गेला आहे. पाकिस्तान या दोन देशांच्या जिवावरच भारतासोबत युद्धाची खुमखुमी बाळगून आहे.

पाकिस्तान हवाई दलाने (पीएएफ) पेन्सी, स्कार्दू आणि स्वात या प्रमुख हवाई तळांना सक्रिय केले आहे. यावर अमेरिकेने दहशतवादाविरोधात लढण्यासाठी दिलेली एफ-१६, जे-१० आणि जेएफ-१७ लढाऊ विमाने तैनात करण्यात आली आहेत.

## पाकिस्तानात भीतीचे वातावरण; लष्कर प्रमुखानंतर बिलावल भुट्टोचे कुटुंबीय देश सोडून पळाले

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८लाहोर

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी करार रद्द करण्यासह पाकिस्तानविरुद्ध इतर अनेक मोठी पावले उचलली आहेत. तसेच, दोन्ही देशांमधील वाढता तणाव पाहता, कधीही युद्ध पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे पाकिस्तानात भीतीचे वातावरण असून, लोक देश सोडून पळून जात आहेत. कालच पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांचे कुटुंब देश सोडून पळाल्याचे वृत्त आले होते. त्यानंतर आता पीपीपीचे प्रमुख बिलावल भुट्टो यांचे कुटुंबदेखील पाकिस्तान सोडून कॅनडाला पळाल्याची माहिती समोर आली आहे.



भारताने सिंधू पाणी करार स्थगित केल्यानंतर बिलावल भुट्टोने धमकी दिली होती की, जर पाकिस्तानचे पाणी थांबवले, तर रक्ताच्या नद्या वाहतील. या धमकीच्या एका दिवसानंतर, म्हणजेच आज त्याच्या कुटुंबातील सदस्य बख्तावर भुट्टो आणि आसिफा भुट्टो पाकिस्तान सोडून कॅनडाला गेल्याची बातमी येत आहे.

**अनेकजण परदेशात पळाले**

भारत कधीही हल्ला करू शकतो, अशी भीती सध्या पाकिस्तानमध्ये आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या सैन्याचे मनोबलही घसरले असून, अनेक अधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबियांना परदेशात पाठवले आहे. यामध्ये पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर याचाही समावेश आहे. या लोकांनी त्यांच्या कुटुंबियांना खाजगी जेटने ब्रिटन आणि न्यू जर्सीला पाठवल्याचे वृत्त आहे.

## पाकिस्तानी नागरिकांनी दिलेल्या वेळेत भारत सोडला नाही तर बसणार मोठा दणका, काय होणार शिक्षा?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८नवी दिल्ली

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध आणखी बिघडले आहेत. भारतानेपाकिस्तान विरुद्ध कठोर पावले उचलली आहेत. पाकिस्तानी नागरिकांना भारतातून निघून जाण्यास सांगितले आहे. तसेच व्हिसाही रद्द करण्यात आले आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने जाहीर केले होते की पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्व व्हिसा २७ एप्रिलपासून रद्द मानले जातील. पाकिस्तानी नागरिकांना दिलेले वैद्यकीय व्हिसा २९ एप्रिलपर्यंत वैध आहेत. याचा अर्थ पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याची शेवटची तारीख २९ एप्रिल आहे. जे पाकिस्तानी निर्धारित वेळेत भारत सोडणार नाहीत, त्यांना मोठी किंमत मोजावी लागणार आहे.




### हल्ल्यानंतर आतापर्यंत किती पाकिस्तानी नागरिक भारताबाहेर गेले?

२४ एप्रिलपासून ५३१ पाकिस्तानी नागरिकांनी भारत सोडला आहे. ते त्यांच्या देशात परतले आहेत. तर ८४३ भारतीय नागरिक पाकिस्तानमधून भारतात परतले आहेत. रविवारी २३७ पाकिस्तानी नागरिक भारतातून पाकिस्तानात परतले आणि ११६ भारतीय नागरिक पाकिस्तानातून भारतात परतले.

जर अंतिम मुदतीनंतर कोणताही पाकिस्तानी नागरिक भारतात दिसला तर त्या नागरिकाला अटक केली जाईल. त्याच्यावर खटला चालवला जाईल आणि त्याला तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा ३ लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात असे स्पष्ट करण्यात आले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने हे पाऊल उचलले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात किमान २६ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. यानंतर, भारत सरकारने कठोर आणि मोठी कारवाई केली आणि सर्व पाकिस्तानींचे व्हिसा रद्द केले. इमिग्रेशन अँड फॉरेनर्स अँक्ट २०२५ नुसार, निर्धारित कालावधीपेक्षा जास्त काळ परदेशात राहणे, व्हिसा अटींचे उल्लंघन करणे किंवा प्रतिबंधित क्षेत्रात अनधिकृत प्रवेश केल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ३ लाख रुपयांपर्यंत दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

## असदुद्दीन ओवैसींनी सुनावले खडे बोल....

## पाकिस्तानने सतत अणुबॉम्बच्या धमक्या देऊ नये,भारतापेक्षा पाकिस्तान अर्ध युग मागे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८नवी दिल्ली

काश्मीरमधल्या पहलगाम या ठिकाणी २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला. त्यात २६ भारतीयांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर देशभरातून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. -खचखच् चे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत. आम्हाला धमक्या देऊ नका, भारतापेक्षा पाकिस्तान अर्ध युग मागे आहे अशी टीका ओवैसींनी केली आहे. एवढंच नाही तर आता पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानचा आर्थिक कणा मोडून त्यांना धडा शिकवावा असंही ओवैसी म्हणाले आहेत.

**काय म्हणाले असदुद्दीन ओवैसी?**

पाकिस्तान भारतापेक्षा अर्धा तास नाही तर अर्धं युग मागे आहे. पाकिस्तानी नेत्यांनी उगाच भारताला धमक्या देऊ नयेत. तुमच्या देशाचं जे बजेट आहे तेवढं आमच्या भारताच्या लष्कराचं



बजेट आहे हे विसरु नका. पाकिस्तानकडून वारंवार सांगितलं जातं की त्यांच्याकडे अणु बॉम्ब आहे. तुम्ही लक्षात ठेवा की दुसऱ्या देशात जाऊन निर्दोषांची हत्या कराल तर कुठलाच देश गप्प बसणार नाही. असं ओवैसी म्हणाले. महाराष्ट्रातल्या परभणी या ठिकाणी असदुद्दीन ओवैसी यांनी वक्फ बोर्डासंदर्भात त्यांची भूमिका मांडली. त्यावेळी त्यांनी पाकिस्तानवर जोरदार टीका केली. २२ एप्रिलला दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. या घटनेचा ओवैसी यांनी निषेध नोंदवला आहे.

**काश्मीर हा आपल्या देशाचा अविभाज्य भाग-ओवैसी**

काश्मीर हा आपल्या देशाचा अविभाज्य भाग आहे. काही टीव्ही चॅनल्सचे अँकर्स हे काश्मिरी नागरिकांच्या विरोधात बोलत आहेत. त्यांना थोडी लाज वाटली पाहिजे. काश्मीर आपलं आहे आणि आपलंच राहिल. भारताचं अभिन्न अंग म्हणजे काश्मीर. आपण काश्मिरी लोकांवर संशय कसा घेऊ शकतो? एक काश्मिरी माणूस होता ज्याने दहशतवाद्यांशी लढताना प्राण गमावले अशा लोकांवर आपण संशय घेता कामा नये असंही ओवैसी यांनी म्हटलं आहे.

## 'दहशतवाद्यांना धर्म विचारायला वेळ नाही, सरकार लोकांना भरकटवतंय', काँग्रेस नेत्याचा आरोप

### फडणवीस म्हणाले 'जखमेवर मीठ चोळण्याचे काम सुरु'

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८मुंबई

काश्मीरच्या पहलगाममधील बैसरन व्हॅलित झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे. २२ एप्रिलला घडलेल्या या हल्ल्यात २६ भारतीय पर्यटक मृत्युमुखी पडले होते. या हल्ल्यानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली. 'दहशतवादी हल्ला करतावेळी लोकांशी बोलत बसतील का? धर्म विचारत बसतील का? सरकार लोकांना भरकटवतंय, असा आरोप वडेट्टीवारांनी केला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलंय.



विजय वडेट्टीवार म्हणाले, 'सत्ताधारी लोक भारत पाकिस्तान असा जप करत बसतात. पहलगाममध्ये घडलेल्या हल्ल्याची जबाबदारी सरकारने घ्यावी. हे सरकारचं अपयश आहे, हे त्यांनी स्वीकारावं. मुख्य म्हणजे काश्मीरच्या खोऱ्यात सुरक्षा का नव्हती? तेथील सुरक्षा व्यवस्था का हटवण्यात आली होती? अतिरेकी सीमा ओलांडून २०० किलोमीटरपर्यंत आत घुसलेच कसे? त्यावेळी मोदी सरकार नेमकं काय करत होतं? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.विजय वडेट्टीवारांनी, सरकारने मूळ मुद्यावरून लोकांना भरकटवू नये असं म्हटलं आहे. तसेच त्यांनी दहशतवाद्यांसह या कटात सामील असलेल्या लोकांनाही पकडून त्यांच्यावरही कारवाई करा, हीच देशातील सर्व नागरिकांची भावना असल्याचं त्यांनी म्हटलंय.

**मुख्यमंत्री फडणवीसांचे प्रत्युत्तर**

विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या आरोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. 'खरंतर अशा प्रकारचे स्टेटमेंट्स देऊन, मृत्यूमुखी पडलेल्या नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचं काम सुरू आहे. आपण नातेवाईकांचं म्हणणं माध्यमांद्वारे ऐकलं. प्रत्यक्षदर्शींनीच सांगितलं की धर्म विचारला होता. त्यावेळी त्या ठिकाणी वडेट्टीवार होते का? इथे बसून नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळणं अतिशय वाईट आहे', असं फडणवीस म्हणाले.

## हाती तलवार घेत नवनीत राणा म्हणाल्या, हिंदुस्थानावर डोळे काढाल, तर डोळेच काढून हाती देऊ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८अमरावती

भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी सोमवारी हाती तलवार घेऊन पाकिस्तानच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. नवनीत राणा म्हणाल्या, हिंदुस्थानवर डोळे वटाराल, तर डोळेच काढून हाती देऊ. नवनीत राणा यांनी तलवार म्यानातून बाहेर काढून पाकिस्तानला इशारा दिला. यावेळी त्यांनी हिंदुस्थान जिंदाबादच्या घोषणाही दिल्या.



आमदार रवी राणा यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सोमवारी येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात मृत्युमूखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पुष्पहार, पुष्पगुच्छ न स्वीकारता साधेपणाने वाढदिवस साजरा करण्याचे आवाहन रवी राणा यांनी युवा स्वाभिमान पक्षाच्या कार्यकर्त्यांना केले होते. यावेळी नवनीत राणा यांनी तलवार उंचावून पाकिस्तानच्या विरोधात घोषणाबाजी केली.नवनीत राणा म्हणाल्या की, दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये जात विचारुन मारले नाही. त्यांनी एकच प्रश्न केला तुम्ही हिंदू आहात का, मुस्लिमांना बाजूला होण्यासाठी सांगितले आणि हिंदूंवर गोळीबार केला. आत जात-पात सोडून हिंदू म्हणून एकत्र येणे गरजेचे आहे.

## शरद पवारांनी जाणीवपूर्वक 'ते' वक्तव्य केले; पहलगामबाबतच्या 'त्या' विधानावरुन भुजबळांचे स्पष्टीकरण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८नाशिक

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ जणांची हत्या केल्यानंतर संतापाची लाट उसळली आहे. जगभरातून या हल्ल्याचा निषेध केला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह शरद पवार यांच्यापर्यंत देशभरातील नेत्यांनी या हल्ल्यावरुन संताप व्यक्त केला आहे. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना ओळख विचारुन त्यांची गोळ्या झाडून हत्या केली होती. हिंदू आहे म्हणून गोळ्या घातल्या यामध्ये कितपत सत्य आहे ते मला माहिती नाही, पण घटनास्थळी उपस्थित



असलेल्या स्त्रियांना सोडल्याचं दिसतंय असं वक्तव्य शरद पवारांनी व्यक्त केलं होतं. त्यावरुन महायुतीच्या नेत्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीडितांच्या नातेवाईकांना भेटा असा सल्ला शरद पवार यांना दिला होता. आता राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी शरद पवारांच्या त्या विधानाबाबत स्पष्टीकरण दिलं आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर शरद पवार यांनी केलेल्या एका वक्तव्यावरुन नवा वाद उफाळून आला आहे. या आधीही दहशतवादी हल्ले झाले आहेत, त्यावेळी धर्माची चर्चा झाली नाही. देशात धार्मिक तेढ वाढेल असं काही करु नये असं आवाहन शरद पवारांनी केलं होतं. त्यावर प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्यांचे नातेवाईक यामध्ये मारले गेले आहेत त्यांनी काय सांगितलं ते ऐकावं आणि मत मांडावं असे म्हटलं होतं. दुसरीकडे शरद पवार यांनी जाणीवपूर्वक तसे वक्तव्य केल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.शरद पवार यांना सगळे कळते. कोण काय बोललं हे त्यांना माहिती असते. पाकिस्तानला आपल्याला टक्कर द्यायची असेल तर हिंदू मुस्लीम वाद वाढता कामा नये यासाठी त्यांनी मुद्दाम ती गोष्ट टाळली. तोच पाकिस्तानचा प्रयत्न आहे. कारण आपल्या देशात २२ कोटी मुस्लम असतील. या सगळ्यांबरोबर आपण लढत बसलो तर बाहेरच्या लोकांबरोबर कसे लढणार? म्हणून त्यांनी जाणीवपूर्वक तसे वक्तव्य केलेले आहे. त्यामुळे त्यांचा निषेध करण्याचा प्रश्न नाही. त्यांना सगळं काही समजतं, असे छगन भुजबळ म्हणाले.

## संपादकीय ......

# दोन ठाकरेंचा सीमाप्रश्न!

*राज आणि उद्धव एकत्र येतील का, या प्रश्नाने पुन्हा डोके वर काढले आहे. राज ठाकरे यांनी टाळीला हात पुढे केला आणि फार आढेवेढे न घेता उद्धव ठाकरे यांनीही संजय राऊतांच्या हाताला हात लावत आपला हात पुढे केला. टाळी अजून वाजलेली नाही आणि लागलेलीही नाही. दोघांचे आता जमले किंवा जमणार असे समजण्याची घाई कराल तर पचका होईल. हे दोघे भाऊ आधी वेगळे का झाले? त्यांच्या वेगळे होण्याची अशी कोणती कारणे शिवसेनाप्रमुख हयात असताना हयात होती आणि आज ती नाहीत?*

*महाराष्ट्राने सीमाप्रश्नाचा नाद कधीच सोडला आहे. बेळगाव कारवारसह कर्नाटकचा मराठी मुलुख महाराष्ट्रात कधीही येणार नाही हे सर्वांना कळून चुकले आहे. याचे कारण सीमाप्रश्नाची सूत्रे भाजप, काँग्रेस या दोन राष्ट्रीय पक्षांच्या हाती आहेत आणि हे दोन्ही पक्ष आपापल्या सीमारेषांमध्ये महाराष्ट्राच्या न्याय्य बाजूनेही उभे राहण्यास तयार नाहीत. जसे सीमाप्रश्नाचे भिजत घोंगडे अनेक पिढ्या पडून आहे उद्धव-राज एकीकरणाचेही तसेच होऊ घातलेले दिसते. फरक इतकाच की सीमाप्रश्नी एक एकीकरण समिती प्रत्येक सरकारात स्थापन होते तशी 'ठाकरे एकीकरण समिती' वगैरे अजून तरी कुणी स्थापलेली नाही. बाकी ठाकरेंची भाऊबंदकी ही शिवसेनेतल्याच सीमाप्रश्नांमधून सुरू झाली असल्याने उद्धव-राज यांच्यातला 'सीमाप्रश्न' सुटला तरच त्यांचे एकीकरण शक्य आहे.राज यांनी उद्धव यांचे नाव न घेता समोरच्यांची इच्छा असेल तर एकत्र काम करण्याची तयारी जाहीर केली. उद्धव यांनीही राज यांचे नाव न घेता शिवसेना आणि महाराष्ट्राच्या मुळावर आलेल्या मंडळींसोबत दादरच्या 'राज कॅफेत' सतत चहापान करणार नाही, असा शब्द मागितला. हा शब्द राज देणार असतील तर माझ्या बाजूनेही नसलेले भांडण मिटवत असल्याचे उद्धव यांनी जाहीर केले. दोघेही म्हणाले, भांडण आमच्यात असे नाहीच. आणि राज तर म्हणाले, महाराष्ट्रापुढे आमच्यातले भांडण किंवा वाद या गोष्टी किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे!*

*गडबड इथून सुरू होते. शिवसेनाप्रमुख सक्रिय असताना राज हे शिवसेनेतून बाहेर पडले. राज यांचे हे बाहेर पडणे साधे, सरळ, सर्वसामान्य आणि सर्वमान्य नव्हते. शिवसेनाप्रमुखांच्या अंगाखांद्यावर राज मोठा झाला आणि आता काही तरी करतूत दाखवावे म्हणून घराबाहेर पडला, असे ते बाहेर पडणे नव्हते. 'दादू येतो रे, भेटू लवकरच', असे सांगून काही राज यांनी निरोप घेतला नव्हता. दादूही मातोश्रीच्या दारापर्यंत राजाला निरोप देण्यास गेला नव्हता. शिवसेनेविरुद्ध महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन करून राज यांनी तेव्हा शिवसेनाप्रमुखांनाच ललकारले. कोणतीही महाशक्ती पाठीशी नसताना इतके मोठे बंड माणूस कुठल्या 'किरकोळ' कारणासाठी करू शकतो? हा उठाव करताना मातोश्रीच्या चार भिंतींत असे कोणते किरकोळ कारण तेंव्हा महाराष्ट्रापेक्षा, शिवसेनाप्रमुखांपेक्षा आणि शिवसेनेपेक्षाही तेव्हा मोठे ठरले? आणि आज अचानक तेच कारण किरकोळ आणि महाराष्ट्र त्यापुढे मोठा वाटू लागला?हे प्रश्न घेऊन कोणीही ठाकरे बंधूंसमोर उभे नाही. कारण उत्तरे माहिती आहेत. राज-उद्धव यांची भाऊबंदकी व्यवहारावरूनच सुरू झाली आणि त्यांचे भांडण राजकीय बंधार्यांचेच आहे. आमच्यातले वाद महाराष्ट्रापुढे , मराठी माणसापुढे किरकोळ आहेत, असे उद्धव आणि राज दोघेही सांगत असले तरी दोघांचाही व्यवहारी पिंड पाहता दोघेही खोटे बोलत आहेत, हे कोणीही सांगेल. आजचे राजकारण हा शुद्ध व्यवहार आहे. व्यवहार जमला तर राज-उद्धव एकत्र येतील. त्यामुळे महाराष्ट्र, मराठी माणूस यांच्यासाठी एकत्र येण्याचा आव आणण्यापेक्षा त्यांनी महाराष्ट्र समोर ठेवून व्यवहाराचे बोलून घेतलेले बरे! व्यवहार जिथून बिनसला तिथून बोलणी सुरू करा. पुणे कुणाचे, नाशिक कुणाला, मराठवाड्याचे काय? आणि मुंबईचे कसे करायचे? पूर्व-पश्चिम करायचे की शहर-उपनगर वाटणी करायची? व्यवहारात नाते वगैरे असत नाही. नाते व्यवहारात वाईटपणा आणते आणि व्यवहार बिनसतो. त्यामुळे आधी व्यवहार जुळतो का पाहा.*

*उद्धव-राज सोबतच काम करत होते. कुणी कुणाच्या हाताखाली नव्हता. नेतृत्वाचा हा पासंग जिथे हलला त्या महाबळेश्वरी दोघेच जाऊन बसलात तरी चालेल. तुमचे नाते तुम्हाला विचारून निर्माण झालेले नाही. ते जन्मतःच तुम्हाला मिळाले. राजकीय व्यवहार मात्र तुम्ही निवडला आणि वेगळे झालात. आताही महाराष्ट्राच्या भल्याचा विचार म्हणून सोबत काम करण्याची तुमची भाषा ही व्यवहारीच आहे. म्हणून ठाकरे बंधूंनी आधी व्यवहार सांधावा. नाते तोडले तरी तुटत नसते. उद्धव-राज एकीकरणाची चर्चा सुरू झाली ती राज यांच्या मुलाखतीने. महेश मांजरेकरांनी ही मुलाखत घेतली असल्याने जिगरी दोस्ताने विचारलेले जिगरी प्रश्न असे मुलाखतीचे स्वरूप साहजिक म्हणायचे. ५६ मिनिटे ५४ सेकंदांच्या मुलाखतीत मांजरेकरांनी भाजप-मनसे युतीचीही चाचपणी केली. गुजरात भेटीपासून महाराष्ट्राचा स्वार्थ म्हणून राज भाजपसोबत राहिले असते तर मुख्यमंत्रीही होऊ शकले असते, अशी भन्नाट पट्टकथा मांजरेकर या मुलाखतीत मांडतात. महाराष्ट्राच्या भल्यासाठी भाजप-मनसेने एकत्र येणे गरजेचे आहे, यावर राज यांचा कौल ते घेतात. त्यावर राज यांनीही शक्यतांची दारे खुली ठेवली आहेत. राज म्हणतात, भाजपसोबत मी येणं राजकीय होईल. सगळ्याच वेव्हलेंथ आमच्या जुळतील असे नाही; पण राजकारणात कुठल्या गोष्टी कधी घडतील सांगता येत नाही. उद्या आमचा शेकहँड देखील होईल किंवा आम्ही समोरासमोर येऊन नमस्काराचे हात जोडले जातील. थोडक्यात, एकाच मुलाखतीत राज यांनी उद्धवसोबत काम करण्याची तयारी दर्शवली आणि भाजपसोबत शेकहँडची आशाही बोलून दाखवली. पुढे काय? महायुतीत चौथ्याला जागा नाही. तीन खुर्च्या मांडताना आमचीच अडचण होते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडे सांगून टाकले. राज यांच्या मैत्रीचा उल्लेख करूनच त्यांनी हे सांगितले. त्यामुळे भाजपसोबत मनसेचा शेकहँड हा दुपारचा चाळा म्हणून ठीक आहे. उद्धव-राज एकत्र येण्याचा मार्ग अनेक अडथळ्यांचा आहे. त्यातले दोन महत्त्वाचे. उद्धव 'महाविकास'मधून बाहेर पडले तर आणि भाजप-शिंदे सेनेची 'सोयीची सोयरीक' तोडून राज स्वतंत्र झाले तरच हे भाऊ एकत्र येतील. भाजप तशी परवानगी देईल का?*

## उन्हाचा पारा वाढला

# शेतकऱ्यांनो जनावारांच्या थंडाव्यासाठी करा हे सोपे उपाय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती–** राज्यात उष्णतेचा पारा वाढला असून तापमान ४० डिग्रीपर्यंत पोहोचले आहे. उष्मा वाढल्याने नागरिकांना त्रास होतोच, त्याचबरोबर जनावरांनाही झळ बसत आहे. दूध उत्पादनालाही फटका बसला असून उष्ण्यापासून बचाव करण्यासाठी पशुपालक जनावरांच्या पाठीवर ओला कपडा, भिजवलेले गोणपाट टाकतात, काही ठिकाणी दिवसातून तीन-चार वेळा पाण्याने भिजवले जाते. यंदा उष्मा कमालीचा वाढला आहे, दुपारी घराबाहेर पडताना मुश्कील होते. जसा माणसांना त्रास होतो, त्यापेक्षा अधिक जनावरांना होतो. जनावरे बंदिस्त असल्याने गरम हवेने त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होतो. उष्ण्यामुळे दूध उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होतो.




**पशुपालकांनी ही काळजी घ्यावी.**

– जनावरांना थेट सूर्यप्रकाश टाळण्यासाठी सावलीची व्यवस्था करा.

– जनावरांना दिवसातून किमान तीन वेळा पाणी द्या. त्यांना थंड पाणी उपलब्ध करून द्या.

– गोठ्यात खेळती हवा असावी. छतावर गवत टाकून पाणी शिंपडल्यास गोठा थंड राहतो.

– शेडमध्ये थंड हवेची व्यवस्था करा. पंखे किंवा कुलरचा वापर करता येऊ शकतो.

**ओल्या गोणपाटाचा गारवा –** जनावरांचे अंग दिवसभर थंड रहावे, यासाठी आमजाई व्हरवडे (ता. राधानगरी) येथील सदाशिव चौगले हे पशुपालक म्हशीच्या पाठीवर ओले गोणपाट टाकतात. दिवसभर ते ओले राहण्यासाठी अधूनमधून पाणी मारतात. त्यामुळे जनावरांना गारवा मिळतो.

**दिवसातून चार वेळा पाण्याने अंघोळ–** साधारणतः पशुपालक आपली जनावरे सकाळी धुतात; पण उन्हाळा सुरू झाला की दोनवेळा त्यांच्या अंगावर पाणी मारतो. आता उष्मा वाढल्याने कुडित्रे (ता. करवीर) येथील अजित पाटील हे गायींचे शरीर थंड राहण्यासाठी दिवसभरामध्ये सतत पाण्याने भिजवतात. म्हाळुंगे (ता. पन्हाळा) येथील शुभांगी सागर पाटील हे आपल्या म्हशीला दिवसातून चार वेळा पाण्याने धुऊन काढावे.




## बीअर पिण्यापेक्षा बीअरने अंघोळ करण्याचे फायदे वाचून व्हाल चकित; डॉक्टरांचे मत घ्या जाणून

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**
बीअर सारख्या अल्कोहोलिक पेयाचा फक्त पिण्यासाठीच नाही, तर अंघोळीसाठी वापर करण्याचे अनेक फायदे आहेत.बीअर बाथ तुमच्या आरोग्यासाठी तुमच्या अपेक्षेपेक्षा नक्कीच जास्त फायदेशीर ठरू शकते.



**बीअर बाथचे फायदे**

बीअरमध्ये आढळणाऱ्या नैसर्गिक घटकांमुळे बीअर बाथमुळे त्वचेला अनेक फायदे मिळू शकतात. हॉप्स हा एक प्रमुख घटक आहे, त्यात दाहकविरोधी आणि जीवाणूंच्या वाढीस प्रतिबंध करणारा गुणधर्म असतो, जो त्वचेला नीट करू शकतो. त्याव्यतिरिक्त बीअरमधील यीस्टमध्ये व्हिटॅमिन बी असते, जे तुमची त्वचा गुळगुळीत करू शकते. बीअर एक नैसर्गिक एक्सफोलिएटरदेखील आहे, जे मृत त्वचेपासून मुक्त होण्यास मदत करू शकतात, असे केअर हॉस्पिटल्सच्या सल्लागार व त्वचारोगतज्ज्ञ डॉ. स्वप्ना प्रिया म्हणाल्या.यीस्ट आणि हॉप्स वनस्पतींसह बीअरमध्ये पॉलीफेनॉलदेखील असतात, जे अँटीऑक्सिडंट्स आहेत आणि त्यामुळे शरीरातील मुक्त रॅडिकल्सपासून मुक्त होण्यास आपल्याला मदत मिळते, ज्यामुळे आपल्या शरीरातील पेशींचे नुकसान टाळता येते.

बीअर बाथमुळे ताण कमी होण्यास आणि आराम मिळण्यास मदत होते. हॉप्स आणि माल्टच्या सुखदायक सुगंधासह गरम पाणी शांत वातावरण तयार करू शकते, ज्यामुळे ताण कमी होण्यास आणि विश्रांती मिळणयासाठी फायदा होतो. असे डॉ. प्रिया म्हणाल्या.

म्हणतात.

बीअर बाथ तुमच्या शरीरातील रक्ताभिसरण सुधारण्यासाठी आणि तुमच्या शरीरातील कोणत्याही सांधेदुखीला आराम देण्यासाठीही ओळखला जातो.बीअरमध्ये असे अनेक घटक असतात, जे बीअर जास्त प्रमाणात सेवन न केल्यास संभाव्य आरोग्यदायी फायदे देऊ शकतात, असे डॉ. प्रिया

# यंदा जमिनीची नांगरणी करतांना वापरा 'ही' पद्धत; उत्पादन वाढून शेतीला होणार फायदे

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**
शेती ही आपल्या देशाची मुख्य जीवनरेखा आहे. पाऊस पडल्यावर खरीप हंगामात विविध मुख्य पिके घेत शेतकरी बांधव आपला उदरनिर्वाह चलवितात. ज्यासाठी उन्हाळ्यात शेतजमिनीची नांगरणी केली जाते. सध्या राज्यात सर्वत्र नांगरणी हंगाम सुरू आहे. चांगले उत्पादन मिळवण्यासाठी जमिनीची योग्य काळजी घेणे गरजेचे असते. ज्यासाठी विशेषतः उतार असलेल्या जमिनीमध्ये पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरणे आवश्यक असते. यासाठी आडवी नांगरणी ही पद्धत फारच उपयुक्त ठरते.

**आडवी नांगरणी म्हणजे काय?–** आडवी नांगरणी म्हणजे उताराच्या उलट दिशेने म्हणजे जमिनीच्या उताराला आडवी, समांतर रेषेत नांगरणी करणे. जेव्हा अशा प्रकारे जमीन नांगरली जाते, तेव्हा पावसाचे पाणी थेट खाली वाहून न जाता थांबले जाते आणि जमिनीत मुरते.

**या पद्धतीमुळे काय फायदे होतात–** शेत जमिनीची आडवी नांगरणी केल्यास विविध फायदे जाणवतात. ज्यात जमिनीची धूप कमी होते, पाणी मुरते, निचरा वाढतो यासोबत आणखी देखील काही फायदे होतात. जाणून घेऊया याच फायद्यांविषयी सविस्तर माहिती.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**जमिनीची धूप कमी होते**

उताराच्या दिशेने नांगरणी केल्यास पावसाचे पाणी मोकळेपणाने वाहते आणि बरोबर मातीही वाहून जाते. पण आडवी नांगरणी केल्यास पाण्याचा प्रवाह अडवला जातो, ज्यामुळे माती वाहून जात नाही. त्यामुळे जमिनीची धूप कमी होते आणि मातीचा पोत टिकून राहतो.

**पाणी जमिनीत मुरते–** पाणी थांबल्यामुळे ते हळूहळू जमिनीत मुरते. याचा थेट फायदा म्हणजे पिकांना योग्य प्रमाणात ओलावा मिळतो. त्यामुळे सिंचनाची गरज कमी होते.

**निचरा शक्ती वाढते**

नांगरणीमुळे मातीची रचना फुलवली जाते आणि जमिनीत हवा खेळती राहते. यामुळे पावसाचे किंवा सिंचनाचे अतिरिक्त पाणी सहजपणे मुरते, आणि जमिनीत पाणी साचून राहत नाही.



**सेंद्रिय पदार्थांचे विघटन**

जमिनीत ओलावा टिकल्याने सेंद्रिय पदार्थांचे विघटन चांगले होते. विघटन झाल्यामुळे तयार झालेले अन्नद्रव्य पिकांना सहज मिळते. त्यामुळे पीक वाढ चांगली होते.

**तण नियंत्रण–** नांगरणी करताना तण उखडले जातात परिणामी काही अंशी तण नष्ट होतात. त्यामुळे पिकांना अन्न, पाणी अधिक मिळते.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# माहिती आयुक्त रवींद्र ठाकरे घेणार सोमवारी पदभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती :** १२माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होते की नाही, यावर देखरेखीसाठी निवडले गेलेले मूळ अमरावतीकर सनदी अधिकारी रवींद्र ठाकरे हे आगामी सोमवारी २८ एप्रिल रोजी नागपूरच्या माहिती आयुक्त पदाचा पदभार स्वीकारणार आहेत.रवींद्र ठाकरे



हे वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत. त्यांनी नागपूरचे जिल्हाधिकारी म्हणूनही काम केले आहे.

वयोमानपरत्वे ते मागील महिन्यात निवृत्त झाले; परंतु त्यांची कार्यकुशलता लक्षात घेता शासनाने त्यांच्यावर नागपूर विभागाच्या माहिती आयुक्त पदाची जबाबदारी सोपवली आहे.त्यांच्या आगमनाची तयारी अधिकाऱ्यांनी सुरू केली आहे.

# वाहन चालविता येते? मग ९२ हजार पगाराच्या 'या' नोकरीसाठी अर्ज कराच


**इच्छुक उमेदवारांना ९ मे २०२५ पर्यंत अर्ज करण्याची संधी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ नोकरी विशेष**
आजच्या धावपळीच्या आयुष्यात वाहन चालविण्याचे कौशल्य असणे अत्यंत महत्वाचे आहे. वाहन चालविता येणारे व्यक्ती आत्मनिर्भर मानले जातात. मात्र, आता वाहन चालविण्याचे हे कौशल्य तुम्हाला भरघोस पगाराची नोकरीही देऊ शकतात.मुंबई उच्च न्यायालयाने स्टाफ कार वाहनचालक पदासाठी भरती प्रक्रिया जाहीर केली आहे. अर्ज करण्याची प्रक्रिया २५ एप्रिल २०२५ पासून सुरू झाली असून, इच्छुक उमेदवारांना ९ मे २०२५ पर्यंत अर्ज करण्याची संधी मिळणार आहे. या भरतीद्वारे न्यायालयाच्या मुंबईतील प्रधान आसनस्थानी एकूण अकरा पदे भरण्यात येणार आहेत.

सध्या तीन पदे रिक्त असून पुढील वर्षात आठ पदे रिक्त होणार आहे. सर्व अकरा पदांसाठी आताच जाहिरात काढण्यात आली आहे. या पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना सातव्या वेतन आयोगानुसार ९२ हजार ३०० पर्यंतचा मासिक पगार मिळणार आहे. सोबतच सरकारी नोकरीशी संबंधित सर्व सुविधा व लाभही लागू होतील.

दहावी उत्तीर्णची अट

या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच



उमेदवाराकडे वैध हलक्या मोटार वाहनांचा परवाना असावा. उमेदवाराने किमान तीन वर्षांचा वाहन चालविण्याचा अनुभव घेतलेला असावा. याशिवाय वाहनांची दुरुस्ती व देखभाल तसेच मुंबई शहरातील भूगोलाची माहिती असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. उमेदवाराचे वय सामान्य प्रवर्गासाठी २१ ते ३८ वर्षांच्या दरम्यान असावे. आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादेत पाच वर्षांची सूट देण्यात आली आहे. मराठी आणि हिंदी भाषांचे वाचन, लेखन आणि संभाषण येणे आवश्यक आहे.

अर्ज करण्यासाठी उमेदवारांना केवळ ऑनलाईन माध्यमाचा वापर करावा लागणार आहे. अर्ज भरताना उमेदवारांनी स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो आणि स्वाक्षरीची स्कॅन केलेली प्रत ठराविक फॉरमॅटमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. अर्ज शुल्क ५०० असून, ते 'एसबीआय कलेक्ट'च्या माध्यमातून ऑनलाईन भरावे लागेल. अर्ज करताना दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे. उमेदवारांची निवड प्रथम शॉर्टलिस्टिंग, त्यानंतर वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी आणि अंतिम मुलाखतीच्या आधारे होणार आहे. वाहन चालविण्याची चाचणी आणि मुलाखत यामध्ये उमेदवाराचा अनुभव, वाहनांची देखभाल याविषयीचं ज्ञान आणि मुंबईतील मार्गांची माहिती तपासली जाणार आहे. अधिकृत माहितीसाठी आणि अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जाहिरातीत नमूद करण्यात आले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २८ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण

श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल व अमरावती श्रमिक पत्रकार संघाचा उपक्रम

## पत्रकारांची दरवर्षी होणार हृदयरोग निदान तपासणी

### संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलची ग्वाही, पहिल्या शिबिरात ५६ जणांची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती–** बदललेल्या जीवनशैलीमुळे हृदयाची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलच्या वतीने दरवर्षी शिबिर घेऊन पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नि:शुल्क हृदयरोग निदान तपासणी करण्यात येईल, अशी ग्वाही हॉस्पिटलच्या विश्वस्त मंडळाने दिली.श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल व अमरावती श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी दहा ते दुपारी दोन दरम्यान पहिलेच पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी हृदयरोग निदान तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिराचा शुभारंभ श्री संत अच्युत महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून झाला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे, हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर, उपाध्यक्ष



सुधीर दिवे, सचिव सागर पासेबंद, कोषाध्यक्ष मुकुंद वाईकर, विश्वस्त मनोज वाडेकर, डॉ. श्रीकांत देशमुख, सुधीर जोशी, शुभदा पोतदार, प्रा. मुरलीधर वाडेकर, नितीन कोल्हटकर, डॉ. गुणवंत डहाणे, पत्रकार संघाचे सचिव रवींद्र लाखोडे, उपाध्यक्ष अमोल इंगोले, कृष्णा लोखंडे व अन्य उपस्थित होते.

एकूण ५६ जणांची तपासणी या शिबिरामध्ये करण्यात आली. प्रत्येकाला आवश्यक त्या सूचना डॉक्टरांनी दिल्या. डॉ. विजय लेवटे, डॉ. शिवराज शिंदे, डॉ. माधुरी कोठारी यांनी प्रज्ञा मनवर, प्राजक्ता वाडेकर, अश्विनी मोहोड, रविना मोहोड, ज्योत्सना परतेकी, अंशूराणी वैद्य, वैष्णवी गोटांगे, सुमरती चिमोटे यांच्या सहकार्याने सर्वांची तपासणी केली. अमरावती श्रमिक पत्रकार संघातर्फे कृतज्ञता म्हणून हॉस्पिटलच्या विश्वस्तांचा सत्कार करण्यात आला. पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर यांनी सर्वांचे आभार मानले. शिबिराला पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता; सात जिल्ह्यांना यलो अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

विदर्भातील काही भागांतील कमाल तापमानाचा पारा काहीसा उतरला असून, सोमवारी (दि. २८) अमरावती, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

या भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ५० ते ६० कि.मी. वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सात जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

दरम्यान, मध्य महाराष्ट्रातील हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. राज्यात मध्य महाराष्ट्रातील काही भागांसह मराठवाड्यातील कमाल तापमानात १ ते २ अंश सेल्सिअसने घट झाली.

मध्य महाराष्ट्रात कोल्हापूर, नाशिक, सांगली, सातारा तसेच सोलापूरसह विदर्भात नागपूर, गोंदिया, वर्धा आणि यवतमाळ भागातील तापमानाचा पारा उतरला आहे.




### तापमानाची चाळिशी

मराठवाड्यात धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि बीडने तापमानाची चाळिशी ओलांडली आहे. राज्यात पुण्यातील लोहगाव येथे ४२.८ अंश सेल्सिअस नोंदविले गेले. पुढील दोन दिवसांत परभणी व हिंगोलीमधील तुरळक ठिकाणी हवामान उष्ण व दमट राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.

## ३ मे पासून श्री गुरुदेव सर्वांगीण बाल सुसंस्कार शिबिराचे प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धा.रेल्वे–** श्री अभा.गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी यांच्या तत्वप्रणालीनुसार गुरुदेव प्रचार विजय दास टेकडी, तालुका श्री धाम्रदेव सेवा धामणगाव गाव स्व. शकुंतलादेवी राधेश्यामजी लोया यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित श्री गुरुदेव सर्वांगीन बाल सुसंस्कार निवासी शिबिर 'श्यामली' चे स्वागत ३ मे ते १५ मे दरम्यान श्रीमती हिराबाई नंदलालजी लोया स्मृती भवन, लोया वाडी येथे आले आहेत.देश, धर्म, संस्कृती आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाईल. अशा संस्कारयुक्त बाल तरूणाची मला घडवली जावीत. असा प्रयत्न अखिल श्री गुरुदेव सेवा मंडळासाठी भारतीय जात आहे. शिबिरामध्ये सर्वधर्मसमभाव, थोर पुरुषांचे चरित्र दर्शन, आदर्श दिनचर्या, स्वावलंबन, सामुदायिक - प्रार्थना, रागीतेतील ओव्या, श्लोक, सूर्यनमस्कार, योगासने व प्राणायाम, लेझीम, मल्लखांब, दांडपट्टा, लाठी काठी, कराटे, भजने, अभंग, मंगलाष्टके, विषय स्थिर सूचना जातील. श्री गुरुदेव सेवा कडून ते १५ वर्षात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिराची सभा नुकतीच पार पडली. या बैठकीमध्ये विठ्ठल दादा काठोडे, रमेशराव ठाकरे, गोपाल भूत, दीपक इंगळे, रवी चौधरी, गोविंद कपिले,



गजानन भेंडे, सुरेश ठाकरे, प्रदीप गोपाल, रवि कडू, अरुण गरड, प्रशांत टांगले, निलेश मोहकार, ठाकरे, हनुमंत ठाकरे, कृष्णा शेंडे, मशुभमंत ठाकरे , चेतन बोरकर, प्रतीक ब्राह्मणकर, शुभम जुनघरे, शुभम इंगळे अरुणराव ठाकरे, आदि उपस्थित होते.

## आ. प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नाने तिन्ही तालुक्यात डायलिसिस सेंटर ला सुरुवात

### ग्रामीण रुग्णालयात उपचार, कमी खर्चात मिळणार डायलिसिस सेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**धामणगाव रेल्वे–** बदललेली जीवनशैली, खाण्याच्या बदललेल्या सवयी, मधुमेहाचे वाढते प्रमाण आदी कारणांमुळे ग्रामीण भागात किडनीच्या वाढलेल्या रुग्णाच्या आजारावर उपचार व्हावे यासाठी तिन्ही तालुक्यात आ. प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नाने ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस सेंटर ला आज सोमवार पासून सुरुवात करण्यात आली आता अमरावती ऐवजी तालुका स्थळी उपचार मिळणार आहे.शहरी भागातच नव्हे तर ग्रामीण भागात किडनी निकामी होण्याचेही प्रमाण वाढत आहे. अशावेळी या रुग्णांना नियमितपणे डायलिसिस सेवा मिळणे गरजेचे आहे.किडनी निकामी झालेल्या रुग्णांना आठवड्यातून किमान दोनवेळा डायलिसिसची आवश्यकता भासते. यासाठी खासगी रुग्णालयात सुमारे दोन ते तीन हजार रुपये खर्च येतो.ग्रामीण भागातील रुग्णांना अमरावती येथील सुपर स्पेशालिस्ट रुग्णालयात गेल्यानंतर सेवा मिळते त्यामुळे धामणगाव मतदार संघातील चांदुर रेल्वे ,धामणगाव रेल्वे ,नांदगाव खंडेश्वर या तालुक्यातील रुग्णांना त्वरित सेवा मिळावी यासाठी ग्रामीण रुग्णालयात सेवा मिळण्यासाठी आ. प्रतापदादा अडसड यांनी पुढाकार घेतला त्याप्रमाणे तिन्ही ठिकाणी उद्या सोमवार पासून डायलिसिस सेंटर सुरू करण्यात येणार आहे चांदूर रेल्वे येथे सकाळी अकरा वाजता या सेंटरचे उद्घाटन होणार आहे



धामणगाव मतदार संघातील किडनी आजार असलेल्या रुग्णांना आठवड्यातून दोन वेळा अमरावती येथे उपचारासाठी जावे लागते आता ही सुविधा तालुक्याच्या ठिकाणी करण्यात आल्याने अल्प दरात रुग्णांना याचा लाभ होणार आहे– **प्रतापदादा अडसड**
आमदारधामणगाव विधानसभा मतदारसंघ–

## माझा मुलगा म्हणतो, मी कट्टर हिंदुत्ववादी गोळी खाणार, पण कुराण वाचणार नाही

### भाजप नेत्या, माजी खा. नवनीत राणा कडाडल्या

### हिंदुत्वाचा पुन्हा केला एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८परतवाडा** –माझा मुलगा लहान आहे, मी त्याला विचारलं की कुराण वाचणार का ? तर तो म्हणतो की मी कट्टर हिदुत्ववादी आहे, गोळी खाणार पण कुराण वाचणार नाही, असे म्हणत भाजपा नेत्या, माजी खा. नवनीत राणा आपण कट्टर हिदुत्त्ववादी असल्याचे जाहीर केले.

भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी पुन्हा एकदा हिदुत्वाचा एल्गार केला आहे. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी कुराण वाचायला सांगितले. आमच्या बहिणींना वाचता आले नाही, तेव्हा दहशतवाद्यांनी सगळ्या हिंदूना आणि मुस्लिमांना एकाबाजूला केलं.



आमच्या हिंदू भावांनी गोळ्या खालल्या पण कलम (कुराण) वाचायला ते तयार झाले नाहीत, असे म्हणत माजी खासदार व भाजप नेत्या नवनीत राणा यांनी पहलगाममधील घटनेची माहिती दिली. पाकिस्तानचा बुट्टो सांगत आहे की, सिधु नदीचं पाणी थांबवलं तर त्याच नदीत हिंदूंचे रक्त दिसेल, अरे अख्ख्या पाकिस्तानमध्ये ताकद नाही की भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची. कारण, भारतात एक वाघ राहतात, ज्याचं नाव नरेंद्र मोदी, अमित शहा आहे. आता पाणी काय तुमचं दाना पण बंद करू, असे नवनीत राणा यांनी म्हटलं.

पंतप्रधान मोदी हे भुट्टो सारख्याला भुट्ट्यासारखं भाजतील, मला मोदीजी, अमित शहा यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. आपल्या आयपीएलचा जेवढा खर्च आहे तितका पाकिस्तानचाखर्च आहे, तितका पाकिस्तानचा जीडीपी आहे, असेही नवनीता राणा म्हणाल्या. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानला थेट इशारा देत हल्लेखोर दहशतवाद्यांना कल्पेनेच्यापलिकडची शिक्षा देणार असल्याचं पीएम मोदींनी म्हटलं. तर, दुसरीकडे राज्यातील नेतेही पाकिस्थान विरोधात त्रिव संताप व्यक्त करीत आहेत.


## १ मे महाराष्ट्र दिनापासून मनपा सुरक्षारक्षकांना नवीन ड्रेसकोड

### आता दिसणार खाकी वर्दीत....

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती–** महापालिकेच्या सुरक्षेचा भार सांभाळणाऱ्या सुरक्षा रक्षक मंडळाने खाकी वर्दीची लढाई अखेर जिंकली. रत्नागिरी, मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, नागपूर पाठोपाठ आता अमरावती महानगरपालिकेची सुरक्षासुध्दा आता खाकी वर्दी करणार आहे.

१ मे महाराष्ट्र दिनापासून नवीन ड्रेसकोडची अमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे आता मे महिन्यापासून अमरावती महानगरपालिका खाकीच्या सुरक्षेत राहणार आहे.

गेली ९ वर्ष सुरक्षारक्षक गणवेश बदलण्यासाठी लढा देत होते. महानगरपालिका, नगरपालिकेसह विविध आस्थापनांची सुरक्षा ही सुरक्षा रक्षकांच्या हातात आहे. विविध आस्थापनांसोबत जिल्ह्यातील मोठ मोठ्या मंदिरांमध्ये तसेच जिल्ह्यात कुठेही मंत्री, खासदार, आमदारांचा कार्यक्रम असला तरीसुध्दा सुरक्षा रक्षकांची ड्युटी लावली जाते. या सुरक्षा रक्षकांच्या ड्रेसचा रंग हलका निळा आहे. त्यामुळे गर्दी कमी करण्यासाठी म्हणा किंवा नागरिकांना हटविण्यासाठी सुरक्षा रक्षकांचा जसा पाहिजे तसा प्रभाव पडत नाही. त्यामुळे सुरक्षारक्षक मंडळाने सुरक्षा रक्षकांचा ड्रेसकोड खाकी करण्यात यावा, अशी मागणी केली. त्या मागणीला यश प्राप्त झाले असून राज्यशासनाने



महामंडळाच्या सुरक्षा रक्षकांना खाकी वर्दी वापरण्याची परवानगी दिली असल्याने नागपूर पाठोपाठ आता अमरावती महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांनासुध्दा खाकी रंगाचा ड्रेसकोड मिळाला आहे.

अमरावती महापालिकेत ११६ सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात आले. हे सुरक्षा रक्षक महानगरपालिका मुख्य इमारती सोबतच शाळा, उद्यान, दवाखाने या ठिकाणी कार्यरत आहेत. शहरात गणपती असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी सर्व सणाला सुरक्षारक्षकांच्या वतीने बंदोबस्त करण्यात येतो. गर्दीच्या ठिकाणी नागरिकांवरही आता सुरक्षारक्षकांचा दबाव पडणार आहे. महापालिका आता नेहमीच खाकी वर्दीच्या छायेत दिसून येणार आहे. या सुरक्षा रक्षकांना मार्च महिन्यातच खाकी वर्दीचा कपडा देण्यात आला होता. ड्रेस शिवण्याकरिता प्रत्येक सुरक्षा रक्षकाला प्रति गणवेश १२०० रुपये महामंडळाकडून देण्यात आले. १ मे कामगार दिनापासून जिल्हयातील सर्व सुरक्षारक्षक आता खाकी वर्दीमध्ये दिसणार आहेत. सुरक्षा रक्षक महामंडळाकडून प्रत्येक सुरक्षारक्षकाला दोन ड्रेस देण्यात आले असून त्यासोबत साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

## १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिकांची ४ दिवसांपासून चाके थांबलेलीच

### गर्भवती माता-बालकांना रुग्णालयात पोहोचवण्यात विलंब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मेळघाट–** गरोदर मातांची प्रसूती आणि प्रसुतीपूर्व निदान, तसेच पाच वर्षांपर्यंतच्या बालकांच्या तपासणीसाठी शासनाने १०२ क्रमांकावर फोन करून रुग्णवाहिका (म्बुलन्स) मागवण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याचा लाभ गरीब व रुग्णालयांपासून दूरवर राहणाऱ्या कुटुंबांना घेता येतो. रुग्णालयात ने-आण करण्यासाठी हे वाहन वापरता येते. परंतु, गेल्या चार दिवसांपासून इंधनाअभावी या रुग्णवाहिका त्याच ठिकाणी उभ्या आहेत. त्यामुळे गर्भवती माता आणि बालकांना रुग्णालयात पोचण्यासाठी स्वखर्चाने इतर साधनांचा वापर करावा लागत आहे.

अमरावती जिल्ह्यात धारणी आणि चिखलदरा हे आदिवासी-कोरकूबहुल तालुके आहेत. मेळघाट नावाच्या या परिसरातील बव्हंशी नागरिक पडेल ते काम करून हातमजुरीवर जगतात. या कुटुंबीयांना १०२ क्रमांकावरील म्बुलन्सची मोठी मदत होते. परंतु, गेल्या चार दिवसांपासून त्यांच्या कुटुंबातील गरोदर आणि स्तनदा माता तसेच लहान बालकांचे रुग्णालयात जाणे थांबले आहे. ज्यांना रुग्णालयात जाणे गरजेचेच आहे, त्यांना स्व:खर्चाने प्रवासाचा भार सहन करावा लागत आहे. प्रशासनाच्या मते इंधनासाठी शासनाकडे रकमेची मागणी आधीच नोंदवली आहे. परंतु, वेळेत रक्कम न मिळाल्याने ही



स्थिती उद्भवली. उद्या, सोमवारपर्यंत हा मुद्दा निकाली निघेल, असे आरोग्य विभागाचे म्हणणे आहे. गरजू रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांनी फोन कॉल केल्यानंतर वाहन उपलब्ध होते. जिल्ह्यात त्यासाठी ३१ रुग्णवाहिका आहे. पैकी ९ वाहने ही मेळघाटात धावतात. 'एनएचएम' मार्फत प्रति ट्रिप पाच हजार रु. इंधन पुरवले जाते.

अशी आहे या सेवेची व्याख्या केंद्र शासनाची ही सेवा १०२ रुग्णवाहिका सेवा जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (जेएसएसके) म्हणूनही ओळखली जाते. गरोदर महिला, अर्भक आणि पाच वर्षापर्यंतच्या बालकांना मोफत रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्याचा हा भारत सरकारचा एक उपक्रम आहे. ही सेवा ट्वेंटी फोर बाय सेव्हन उपलब्ध असेल, असे सांगितले जाते. शिवाय, या योजनेची रुग्णवाहिका ही मूलभूत जीवन समर्थन उपकरणांनी (लाईफ सपोर्ट सिस्टीम) सुसज्ज आहे.

वारंवार फोन करूनही मला १०२ क्रमांकावरून रुग्णवाहिका मिळाली नाही. दवाखान्यातील लोकं फक्त म्बुलन्स बंद आहे, एवढेच सांगत होते. इंधनाअभावी ही वेळ ओढवली हे मला नंतर माहित झाले. परंतु इंधन उपलब्ध असतानाही कधी वाहन नादुरुस्त असणे तर कधी चालक वेळेवर उपलब्ध न होणे, असे प्रकार घडले आहेत.

**– सोनू बेठेकर, तारुबांदा, मेळघाट.**

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची कलश रथयात्रा जिल्ह्यात

## रा. काँ. विभागीय समन्वयक आ. संजय खोडके यांनी दिली माहिती

### संत गाडगेबाबा समाधी मंदिर येथे मंगल कलश यात्रेचे होणार अभूतपूर्व स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती:**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे यंदाच्या ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्ताने संपूर्ण राज्यभरात मंगल कलश रथयात्रेला सुरुवात झाली आहे. यानिमित्ताने महाराष्ट्राच्या प्रत्येक भागातील महापुरुषांच्या वास्तव्याने समृद्ध झालेल्या प्रदेशांतील माती व पाणी मंगल कलशांमध्ये एकत्रित करण्यात येत आहे. या रथयात्रेचे २९ व ३० एप्रिल रोजी अमरावती विभागात आगमन होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची महासमाधी मोझरी ते सिंदखेड राजा माँ साहेब जिजाऊ यांचे स्मारक असा दोन दिवस दौरा राहणार आहे. अमरावती विभागात रथयात्रेच्या स्वागतानिमित्त नुकतीच २६ एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृह येथे रा. काॅ. विभागीय समन्वयक आ. संजय खोडके यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीमध्ये आ. संजय खोडके यांनी सांगितले की, २९ एप्रिल २०२५ सकाळी ९ वाजता राष्ट्रवादीची मंगल कलश रथयात्रा गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधीवर समाधीवर पोहोचणार आहे. तिथे पूजन व प्रार्थना होणार असून जिल्ह्यातील गाविलगड किल्ला चिखलदरा, जैन तीर्थस्थळ मुक्तागिरी, संत श्री गुलाबराव महाराज जन्मस्थान माधान, महानुभव पंथाची काशी श्री क्षेत्र रिद्धपूर, गाडगेबाबांचे निर्वाणस्थान वलगाव, विदर्भ कन्या रुक्मिणी देवीचे माहेर कौंडण्यपूर इत्यादी ठिकाणाहून एकत्रित केलेले पवित्र माती व नदीचे पाणी कलशामध्ये विसर्जित करण्यात येणार आहे. त्यानंतर रथयात्रा अमरावतीकडे मार्गस्थहोणार असून सकाळी १०:३० वा गाडगे नगर स्थित संत गाडगेबाबा महाराज समाधीस्थळ येथे दाखल होताच अमरावतीत रथयात्रेचे जंगी स्वागत होणार आहे. तेथून रथयात्रा ही डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे जन्मगाव पापळ कडे रवाना होणार असून दुपारी २ वाजता पापळ येथे नियोजित कार्यक्रम होणार आहे. नंतर सायंकाळी ४:३० वाजता कारंजा जिल्हा वाशिमकडे रवाना होईल. रथयात्रेच्या जय्यत तयारीकरिता पदाधिकारी, कार्यकर्त्यांना जबाबदारीचे वाटप करण्यात आले. बैठकीला अमरावतीच्या आ. सौ. सुलभाताई खोडके, आ. अमोल मिटकरी यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. यावेळी अमरावती विभागातील राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष तसेच प्रमुख नेते प्रामुख्याने उपस्थित होते.

# अचलपुरातील रोजगार मेळाव्याला सुशिक्षित बेरोजगारांचा भव्य प्रतिसाद

## विविध नामांतीक ९५ कंपन्यांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अचलपूर** : – आ. प्रवीण तायडे यांच्या पुढाकाराने स्थानिक कल्याण मंडपममध्ये सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम मिळावे, यासाठी रोजगार मेळाव्याचे रविवार २७ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले. सदर मेळाव्याला नोकरीसाठी आलेल्या इत्छुकांनी मोठ्याप्रमाणात हजेरी लावली. राज्यासह राज्याबाहेरील विविध नामवंत ९५ कंपन्यांनी ५ हजार रिक्त पदांकरिता शैक्षणिक अर्हतेनुसार प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या आणि संबंधित उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आले. तत्पूर्वी आ. प्रवीण तायडे यांनी उपस्थित बेरोजगार मुलांना संबोधित केले. जी मुले–गुली शिकलेली आहेत, पण त्यांना रोजगार नाही किंवा रोजगार कसा मिळवावा, यासाठी त्यांचे प्रयत्न कमी पडतात, अशा मुलासाठी आजचा रोजगार मेळावा असून ही आपल्यासाठी सुवर्णसंधी आहे, असे याप्रसंगी आ. तायडे म्हणाले. याठिकाणी उपस्थित असलेली मुलेही शेतकरी, शेतमजुरांची आहे. पदराला गाठी पाडून या मुलांना आई–वडिलांनी शिकविले आहे.त्यामुळे मुलांना नोकरी लागावी, असे प्रत्येकाच्या आई–वडिलांचे स्वप्न असते. हा मेळावा आपल्या स्वप्नांना साकार करणारा ठरणारा असल्याचेही पुढे बोलताना आ.प्रवीण तायडे म्हणाले.

या रोजगार मेळाव्यात १०वी, १२ वी, पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा आणि अभियांत्रिकी व अन्य व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांची विविध पदांवर थेट मुलाखतीद्वारे निवड करण्यात आली. रोजगार मेळाव्याता नोकरीच्या विविध क्षेत्रातील कंपन्यांनी आपली भरती प्रक्रिया राबविली. उमेदवारांनी मेळाव्यात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले होते. त्या अनुषंगाने हजारो शिक्षित मुला–मुलींनी आपल्या शिक्षणानुसार पदांकरिता ऑनलाईन नोंदणी केली, त्या अनुषंगाने सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या प्रतींसह तसेच ओळखपत्र घेऊन रविवारी सकाळी १० वाजता कल्याण मंडपम येथे मुला–मुलीची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली.या मेळाव्याला भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. मुलांच्या सोयीसाठी सर्वत्र विविध स्टॉल्स लावण्यात आले होते. स्वयंसेवकाव्या माध्यमातून उपस्थित मुला–मुलींना वेळोवेळी मार्गदर्शन केले जात होते. उन्हाची दाहकता लक्षात घेता पाण्याच्या थंडगार बॉटल्सची व्यवस्था करण्यात आली. भाजपचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी मोलाचे श्रम घेतले.



# ‘अंबादेवी शैलाश्रय’ भारतातील अश्मयुगीन काळातील सर्वात प्राचीन ज्ञात भित्तीचित्रे!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**

सुमारे अठरा वर्षांपुर्वी अमरावतीच्या सहा निसर्ग संशोधकांनी विदर्भ आणि मध्य प्रदेशच्या सीमेवर सातपुडा पर्वतरांगांमध्ये सर्वप्रथम शोधलेल्या अश्मयुगीन चित्र गुहेतील चित्रे भारतातील सर्वात प्राचीन शैलचित्र ठरु शकतात, असे मत ज्येष्ठ संशोधक डॉ विजय इंगोले यांनी व्यक्त केले आहे.



ही अश्मयुगीन आदी मानवाची सर्वात जुनी आणि सर्वात मोठी वसाहत येथे असावी. मध्य प्रदेशातील ‘भिमबेटका’ येथील शैलचित्रे सर्वात जूनी म्हणजे १० ते १५ हजार वर्षांपूर्वीची असावीत, असे तज्ज्ञांचे मत आहे. परंतु अमरावतीच्या निसर्ग संशोधकांनी शोधलेली शैलचित्रे ही भिमबेटका पेक्षाही जवळपास २० हजार वर्षांपूर्वीची आहेत. विदर्भ आणि मध्य प्रदेशच्या सीमेवरील अंबादेवी परिसरातील चित्रगुहेत सापडलेले शहामृगाचे चित्र, त्यांच्या अंड्याच्या कवचाचे डीएनए आणि कार्बन डेटिंगच्या परीक्षणानंतर ही शैलचित्रे २४ हजार ते ४२ हजार वर्षांपूर्वीची असल्याचे सिद्ध झाले आहे.यासंबंधी संशोधक डॉ विजय इंगोले यांचा शोध निबंध २०२० मध्ये प्रकाशित देखील झाला आहे. या संशोधन पत्राला मान्यता देखील मिळाली आहे . त्यावरुन भारतात ३५ हजार वर्षांपूर्वी शहामृगाचे अस्तित्व या भागात होते. तसेच त्याच्या अस्तित्वाच्या काळात अंबादेवी शैलगुहेतील चित्रे ही पूर्व अश्मयुगीन काळातील असल्याचेही स्पष्ट होते. अशा प्रकारचे शहामृगाचे चित्र भारतात कुठेही नाही.

अंबादेवी राक शेल्टर परिसरातील मुंगसादेव नावाच्या चित्रगुहेत इतर वन्यप्राण्यांच्या चित्राप्रमाणे शिवथेरियम ( जिराफ सदृश प्राणी), आर्डवार्कसारखा कीटकभक्षी प्राणी आणि आफ्रिकन रान कुत्र्यासारखे प्राणी अत्यंत बारकाईने चितारले आहेत. अश्मयुगीन आदीमानवाने चितारलेली वन्यजीवांची अशी अचूक चित्रे त्यांनी आपल्या प्रत्यक्ष नजरेतून बघितलेली असल्याने शक्य झाले, असे संशोधक डॉ विजय इंगोले यांनी स्पष्ट केले.

हा जवळपास ३५ हजार वर्षांपूर्वीच्या अश्मयुगीन चित्रगुहांचा शोध फक्त भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात प्राचीन चित्रकलेच्या संदर्भातील एक क्रांतिकारी दावा ठरु शकतो. निसर्ग संशोधकांच्या चमूने आता भारतीय पुरातत्व विभाग आणि युनेस्को यांच्याकडे या परिसरास जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.


# श्री स्वामी समर्थच्या जयघोषाने रहाटगाव परिसर दणाणले

## अखंड नामजपाचा हजारो भाविकांनी घेतला लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–**

श्री स्वामी समर्थ नाम भक्त पुकारे, हम सब भक्त सेवक तुमारे. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी महोत्सव व अखंड नामजप यज्ञ सप्ताहाचे आयोजन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, आरोग्य सेवा कॉलनी रहाटगाव येथे मोठ्या भक्ती भावाने करण्यात आले. सात दिवसीय महोत्सवात श्री स्वामी समर्थ सेवेकरी व भाविक भक्त मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही स्वामींचा पुण्यतिथी महोत्सव साजरा करण्यात आला. सात दिवसीय महोत्सवात ग्रामदेवता आमंत्रण, सप्ताह प्रारंभ, देवता स्थापना ,स्थापित देवता, हवन ,गुरुचरित्र वाचन, नित्य स्वाहाकार, गणेश याग,रुद्र याग, स्वामी याग, बली पूर्णाहुती, श्री सत्यदत्त पूजन, भगवतीला अलंकार यज्ञाद्वारे अर्पण करून महाआरती करण्यात आली .त्यानंतर सर्वांना काल्याचे वाटप करण्यात आले. टाळ मृदुंग व चिपळ्यांच्या गजरात श्री स्वामी समर्थांची पालखी काढण्यात आली होती.




यावेळी श्री स्वामी समर्थांच्या गजराने संपूर्ण परिसर दणाणला होता. यावेळी कृष्णराव बोरखडे, निर्मला बोरखडे, स्वाती बोरखडे, नयना ताई गावंडे, विजयाताई राऊत, पांडुरंगजी पारतकर, छाया पारतकर, दीपकराव देशमुख साहेब, परणकर साहेब, निलेश राव पाटील, चंद्रकांत मेहरे, सुधाकर ताथोड, अमोल महल्ले, प्रणव माहोरे, छगन डोईजड, शालिनी डोईजड, पोर्णिमा गभणे,दिपाली सहारे, राजेंद्र ठाकरे, साधना ठाकरे, वृषाली कडू, चित्रा जाधव, स्नेहल गावनेर, प्रिया वाडूरकर,राजेश गोलाईतवार, आकाश बांते, सुधाकर पाचघरे, अर्चना पाचघरे अर्चना पाचघरे,दिलीपराव देशमुख, प्रतीक जीभकाटे, प्रदीप कोल्हे, प्रफुल्ल सहारे, पियुष देशमुख, प्रदीप शिंगोटे ,शशी अर्डक, काकासाहेब मोरे ,राजेश तोमर ,अक्षय काटोलकर, प्रशांत केराम ,राजेश रोंघे, गायकवाड साहेब, पंकज देशमुख, बाळासाहेब खारोडे ,मिलिंद देशमुख, सुभाष रंगे, सुनील ठाकरे, मंगेश रोंघे ,गजानन गांजरे, त्रिंबक नागपुरे, गजानन उके, प्रशांत बेलसरे, मिथिलेश बजाज, ओम देशमुख ,अनिल निस्ताने, ज्ञानेश्वर चेंडे ,अक्षय राऊत, धनराज डहाके, निलेश कोठे ,दिघडे दादा, रणजीत भुंबर, लकी गभणे ,कार्तिक चौबे तसेच शहरातील व ग्रामीण भागातील भाविक भक्त व सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्दीचा सन्मान राखा; एकनाथ शिंदे यांची आमदार गायकवाड यांना भर सभेत समज!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बुलढाणा–** आपण प्रथम जबाबदार शिवसैनिक, नंतर आमदार किंवा मंत्री. शिवसैनिक म्हणजे शिस्त आणि आदर्श. आपल्या वर्तनामुळे पोलिस दलाची प्रतिमा मलीन होऊ नये, वर्दीचा सन्मान राखला गेला पाहिजे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार संजय गायकवाड यांना समज दिली. पोलिस दलाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने त्यांनी गायकवाड यांच्यावर नाराजी व्यक्त केली. जिजामाता प्रेक्षागृहात रविवारी आभार सभेत बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात बोटावर मोजण्याएवढी अपवादात्मक चुकीची माणसं असतात. म्हणून संपूर्ण क्षेत्राला दोषी धरता येत नाही. एखाद्या पोलिसाच्या बाबतीत तक्रार असेल, तर थेट माझ्याकडे किंवा मुख्यमंत्र्यांकडे मांडावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

**कारवाईचा इशारा–** मुख्यमंत्री आणि गृहमंत्री फडणवीस यांनी आमदार गायकवाड यांच्या वक्तव्याची दखल घेत उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याशी बोलून गायकवाड यांना कडक समज देण्यास सांगणार आहे. वारंवार असे चालणार नाही. ते बोलतच असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा दिला होता.



**आमदारांविरोधात गुन्हा–** पोलिस दलावर टीका केल्याप्रकरणी आमदार संजय गायकवाड यांच्याविरुद्ध बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत पोलिस दलाला ‘अकार्यक्षम’ आणि ‘हप्तेखोर’ म्हणत तीव्र शब्दांत टीका केली होती. आमदार गायकवाड यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत, पोलिस दल अकार्यक्षम असल्याची टीका केली होती. त्यावर उपमुख्यमंत्र्यांनी सभेत गायकवाड यांना समज दिली. मात्र, गायकवाड यांनी खुलासा करत, माझे वक्तव्य संपूर्ण पोलिस दलावर नव्हते, असे स्पष्ट करून माफीही मागितली.

# महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेत परिमंडळातील २०५ वीज ग्राहकांना बक्षीस जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**

महावितरणच्या लकी डिजीटल ग्राहक योजनेच्या पहिल्या ड्रॉ (सोडती) मध्ये अमरावती परिमंडळातील २०५ वीजग्राहकांना बक्षिसे जाहीर झाली आहेत. त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ११५ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ९० ग्राहकांचा समावेश असुन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात विजेत्या वीज ग्राहकांना बक्षीस म्हणून उपविभागनिहाय स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच वितरीत करण्यात येत आहेत.

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा सहभाग वाढविण्याच्या हेतूने प्रोत्साहनपर लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले ऑनलाईन पध्दतीने भरून बक्षीस मिळवण्याची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.योजनेत प्रत्येक उपविभागस्तरावर ५ बक्षिसे असून एकूण तीन लकी ड्रॉ (सोडती )काढण्यात येणार आहेत. प्रत्येक उपविभागासाठी प्रथम क्रमांक– एक स्मार्ट फोन (सँमसंग), द्वितीय क्रमांक– दोन स्मार्ट फोन (रेडमी) आणि तृतीय क्रमांक दोन स्मार्ट घड्याळ अशी प्रत्येकी पाच बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. त्यानुसार अमरावती परिमंडळाअंतर्गत अमरावती



जिल्ह्यातील २३ उपविभागांसाठी ११५ आणि यवतमाळ जिल्ह्यातील १८ उपविभागासाठी ९० ग्राहकांसाठी पहिला लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने दि. ७ एप्रिलला काढण्यात आला.

अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, प्रविण दरोली यांच्या पुढाकाराने आणि वरीष्ठ व्यवस्थापक वित्त व लेखा विजय पचारे, व्यवस्थापक विकास बांबल आणि प्रमोद चव्हाण,उपविभागीय कार्यालय यांच्या सहकार्याने उपविभाग निहाय विजेत्या ग्राहकांना बक्षिस वितरण करण्यात आले आहे.

ग्राहकांना दि. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ पर्यंत सलग तीन किंवा त्यापेक्षा अधिक महिन्यांत नेटबँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय,वॉलेट, कॅशकार्ड, एनएसीएच,क्यूआर कोड,एनईएफटी, आरटीजीएस आदींद्वारे ऑनलाइन वीजबिल भरून योजनेत सहभागी होता येईल. तसेच मागील महिन्याच्या वीजबिलाची १० रुपयांपेक्षा अधिक थकबाकी नसावी. ऑनलाइन व संगणकीय पद्धतीने लकी ड्रॉ काढण्यात येणार असून योजनेच्या कालावधीत एक ग्राहक/ ग्राहक क्रमांक फक्त एकाच बक्षिसासाठी पात्र राहील.या योजनेत यापुढे मे आणि जून महिन्यात संगणकीय पद्धतीने लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे. त्याचा निकाल संबंधित महिन्यांच्या पहिल्या आठवड्यात महावितरणच्या वेबसाईटवर जाहीर होईल. तसेच संबंधित विजेत्या ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर बक्षिस जिंकल्याची माहिती देण्यात येईल. किंवा विजेते ग्राहक देखील तीन दिवसांच्या आत जवळच्या कार्यालयाशी संपर्क साधू शकतात. महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर लकी डिजिटल ग्राहक योजनेबाबत अधिक माहिती उपलब्ध आहे.

# प्रत्येक मंडळात महाराजस्व अभियान राबविणार - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**



राज्य शासनाने पारदर्शी आणि गतीमान सरकारचे धोरण ठरविले आहे. शासकीय कार्यालयातील कामे सहजपणे आणि विनातक्रार होण्यासाठी यंत्रणा राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या आवश्यक कामांसाठी आता प्रत्येक मंडळात महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आज उद्घाटन करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवि राणा, प्रविण तायडे, राजेश वानखडे, नवनीत राणा, सुनिल देशमुख, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी विविध पावले उचलण्यात येत आहे. नागरिकांचे कामे प्रामाणिकपणे करून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. मंडळ स्तरावर होणाऱ्या महाराजस्व अभिनायात आलेल्या नागरिकांच्या अर्जावर त्याच ठिकाणी निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. जनतेचे कल्याण करण्याचा संकल्प करण्यात आला असून प्रशासनाचे सहकार्य यात घेतले जात आहे. नागरिकांचा शासनावरील विश्वास वाढविण्यासाठी महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. अमरावतीच्या विकासासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत आहे. अमरावती विमानतळ आणि त्याची धावपट्टी वाढविणे, पायलट प्रशिक्षण केंद्र, आयटी पार्क, पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क येत्या काळात पूर्ण करण्यात येतील. त्यासोबतच येत्या काळात पिण्याच्या पाण्याची योजना पूर्ण करून अमरावतीला पुढील ५० वर्षे पाणी पुरेल याची व्यवस्था करण्यात येईल. तसेच जाहिरनाम्यात दिलेले शेतकऱ्यांना मोफत वीज, लाडकी बहिण आदी योजनांच्या अंमलबजावणीसोबत मेळघाटातील रस्ते जोडणीचा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी खासदार डॉ. बोंडे, रवि राणा यांनी मनोगत व्यक्त केले. तहसिलदार विजय लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बचतगटांना स्वनिधी, ट्रॅक्टर, कृषी अवजारे, तीनचाकी सायकल, विहिरीचे कार्यादेश आदी लाभांचे वाटप करण्यात आले.


# वाढदिवस नव्हे,जनसेवा दिवस......



आ.रवी राणा यांच्या वाढदिवसाच्या निमित्याने पहालगाम येथे आतंकी हल्यामधे शहीद झालेल्या निष्पाप नागरिकांच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान शिबीर,निशुल्क आरोग्य शिबीर, छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीरचे उदघाटन मा.ना. चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री अमरावती यांच्या उपस्थितीत आज सांस्कृतिक भवन येथे पार पडले.या वेळी खासदार डॉ.अनिल बोंडे,मा.खा.नवनीत राणा,आ.प्रवीण तायडे,आ.राजेश वानखडे उपस्थित होते.

# सात लाख हेक्टरवर होणार खरीप हंगामाची पेरणी : खते,बियाणे ही महागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**



यंदाच्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाची तयारी सुरू झाली आहे. यावर्षी सरासरी सात लाख हेक्टर क्षेत्र प्रस्तावित आहे. त्यासाठी प्रथमच तालुकास्तरावरून नियोजन करण्यात येत आहे; मात्र, शेतकऱ्यांचा कल कपाशी, सोयाबीन व तूर या पारंपरिक पिकांकडे आहे. या पिकांचेच ९० टक्के क्षेत्र राहणार आहे.

यावर्षीदेखील सर्वाधिक २.६५ लाख हेक्टरवर सोयाबीनचे क्षेत्र राहणार आहे. यामध्ये पावसाला विलंब झाल्यास कपाशीची क्षेत्रवाढ होऊ शकते. शिवाय सोयाबीनला वर्षभर हमीभावही न मिळाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यामुळेही कपाशीची क्षेत्रवाढ होऊ शकते. अशी शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे.यंदाच्या खरिपासाठी १,४३,६६९ मेट्रिक टन रासायनिक खते मंजूर करण्यात आली आहेत. युरिया ४०५, डीएपी २१२४४, एमओपी ४५२०, एनपीके ४४६००, एसएसपी ३७२०० मेट्रिक टन रासायनिक खतांची मागणी नोंदविण्यात आली आहे.

# चिखलदऱ्याचा पारा पोहचला ३८ अंशावर : अपुऱ्या सुविधांमुळे पर्यटकांनी फिरविली पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चिखलदरा**



विदर्भातील थंड हवेचे ठिकाण अशी ओळख असणाऱ्या चिखलदरा या पर्यटनस्थळाला यावर्षी उन्हाचा जबर फटका बसला आहे. चिखलदराचा पारा हा ३८ अंश सेल्सिअसच्या पार गेला आहे. त्यामुळे हिल स्टेशनऐवजी हे हॉटेस्ट डेस्टिनेशन ठरत आहे. याचा फटका स्थानिक हॉटेल व्यावसायिकांना बसला आहे. बेपत्ता नेटवर्क, क्षणात बेपत्ता होणारा विद्युत पुरवठा, अपुरा पाणी पुरवठा, खराब रस्त्यांचा सामना अशा समस्यांचे हे स्थळ माहेरघर बनले आहे.

**सातपुडा पर्वतरांगेत वसलेले वपर्यटकांअभावी ओस पडलेले पर्यटनस्थळ**

विदर्भाचे नंदनवन समजले जाणारे चिखलदरा शहर राज्यातील महत्त्वाच्या पर्यटनस्थळांपैकी एक आहे. दरवर्षी राज्यभरातून दीड लाखांवर पर्यटक भेट देतात. जून महिन्यात पावसाळा सुरू झाला की, हजारो पर्यटकांचा ओढा याठिकाणी असतो. मात्र, यावर्षी उन्हाळ्यात चिखलदऱ्याच्या तापमानात वाढ झाली. सध्या पारा हा ३८ अंश सेल्सिअसवर गेला आहे. परिणामी, पर्यटनस्थळावरील रस्त्यांवर शुकशुकाट असून, एकही पर्यटक दिसून येत नाही.बेपत्ता नेटवर्क चिखलदरा पर्यटनस्थळी पिण्याच्या पाण्यासाठी स्थानिकांचीच भटकंती होत आहे. दुसरीकडे पर्यटकांना हजारो रुपये खर्चुन सुविधा मिळत नसल्याचे चित्र आहे. पावसाळा, हिवाळा वगळता उन्हाळ्यात पर्यटकांनी पाठ फिरवली आहे.

> विदर्भात सध्या पारा ४५ पर्यंत गेला आहे. चिखलदरा शहरात मोठ्या प्रमाणात काँक्रिटीकरण सुरू आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली आहे. यामुळे तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे.
>
> **प्रा. अनिल बंड,**
> **हवामान तज्ज्ञ.**

# मेहंदी, हळदीच्या खर्चाने वर-वधू पित्याची दमछाक, पाश्चिमात्य ट्रेंड सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**



लग्नसोहळ्यातील ग्रामीण संस्कृती आता मागे पडू लागली आहे.अलीकडे लग्नसमारंभात पाश्चिमात्य संस्कृतीचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. या वाढत्या प्रभावाबद्दल समाजातील अनेक वयस्कर मंडळी चिंता व्यक्त करीत आहेत. या ट्रेंडवर वेळीच सामाजिक बंधने लादली नाहीत, तर ग्रामीण संस्कृतीचा ह्रास होण्यास वेळ लागणार नाही, अशी भीतीही अनेकांनी व्यक्त केली. सध्या शहरी भागासोबत ग्रामीण भागातही प्री-वेडिंग, मेहंदी, हळदी या कार्यक्रमांचा प्रभाव दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. प्री-वेडिंगसाठी नियोजित वधू-वरांचा खास टूर आखला जात आहे. शिवाय मेहंदी व हळदीसाठी एक स्वतंत्र दिवस घालविला जात आहे. या कार्यक्रमात वर-वधूच्या आई-वडिलांसह घरातील सर्वच पाहुणे डीजेसमोर नाचताना दिसत आहेत. नंतर प्री-वेडिंगसह मेहंदी, हळदीची ही क्षणचित्रे लग्नसमारंभाच्या वेळी स्क्रीनवर सर्वांना दाखविली जातात. त्यासाठीही अधिकचा खर्च करावा लागत आहे.

**प्री-वेडिंगची क्षणचित्रे चर्चेचा विषय**

सध्या ग्रामीण भागातही प्री-वेडिंग, मेहंदी, हळदी या कार्यक्रमांचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे. लग्नसमारंभाच्या वेळी स्क्रीनवर दाखविण्यात येणारी वधू-वरांची प्री-वेडिंगची क्षणचित्रे आज चर्चेचा विषय ठरत आहेत. एखाद्या पिक्चरप्रमाणे दिसणारी ही चित्रे स्क्रीनवर येताच वयस्क मंडळींना माना खाली घालाव्या लागतात. याला कुठेतरी ब्रेक लागला पाहिजे, असे मत ज्येष्ठ नागरिक व्यक्त करीत आहे.

**पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव चिंताजनक**

पूर्वीचे विवाह समारंभ तीन दिवस चालायचे. यात मांडव, हळद, लग्नसोहळा, वरात आदी कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने साजरे केले जात. यामध्ये कुठलाही धांगडधिंगा किंवा अवास्तवपणा नव्हता. मोठ्यांचा मानसन्मान राखला जायचा. थट्टा-मस्करी चालायची. लग्नघर जवळपास १५-२० दिवस पाहुण्यांनी गजबजून जात होते.

# बुधवारी सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सव

## ‘अजूनही चांदरात आहे’ ऋषिकेश रानडे, अनिरुद्ध जोशी, आनंदी जोशी यांच्या मराठी व हिंदी गीतांचा बहारदार कार्यक्रम




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

सोमेश्वर पुसतकर मित्र परिवाराच्या वतीने येत्या बुधवारी दिनांक ३० एप्रिल रोजी ऋषिकेश रानडे, अनिरुद्ध जोशी व आनंदी जोशी या नामवंत गायकांच्या मराठी व हिंदी गीतांचा 'अजूनही चांद रात आहे..' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सवातंर्गत श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता आयोजित हा कार्यक्रम संगीत प्रेमींसाठी निःशुल्क आहे. या कार्यक्रमाच्या प्रवेशिका जय फोटो स्टुडिओ, गांधी चौक व रघुवीर मिठाई, गाडगे नगर येथे निःशुल्क उपलब्ध आहेत.

ऋषिकेश रानडे, अनिरुद्ध जोशी व आनंदी जोशी हे तिघेही नामवंत गायक आहेत. ऋषिकेश रानडे हे 'सा रे ग म प' विजेता व सुप्रसिद्ध मराठी पार्श्वगायक आहेत. अनिरुद्ध जोशी हे 'सूर नवा... ध्यास नवा' या कार्यक्रमाचे विजेते आहेत. तर आनंदी जोशी यांना 'झी चित्र गौरव पुरस्कार' आणि सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायिकेसाठी महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या तिघांना एकत्रित ऐकण्याची संधी मिळणे ही पर्वणी आहे. अमरावतीकरांनी ही संधी सोडू नये, गर्दी टाळण्यासाठी सायंकाळी ६ वाजता सभागृहात पोहोचून आपली जागा आरक्षित करावी, असे आवाहन सोमेश्वर पुसतकर मित्र परिवार, आझाद हिंद गणेशोत्सव मंडळ व आम्ही सारे फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# प्रादेशिक परिवहन विभाग कारवाई करणार का?ट्रॅव्हल्सच्या तिकिटात नियमांपेक्षा अधिक भाडेवाढ

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**




लग्नसराई, उन्हाळी सुटी व पर्यटनामुळे ट्रॅव्हल्सला गर्दी वाढली आहे. त्यामुळे लांबच्या पल्लयावर प्रवासाच्या तिकिट दरामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. अमरावती शहरातून सर्वाधिक प्रवासी पुणे, औरंगाबाद मार्गावर जात आहेत. मात्र, बाराशे ते पंधराशे रुपयाचे तिकिट तीन हजारांवर पोहोचले आहे. मे महिन्यात तर याच तिकिटाचे चार हजारांवर पोहोचतात.

अमरावती शहरातून पुणे, औरंगाबाद, नाशिक, मुंबई, इंदोर, सुरत मार्गावर मोठ्या प्रमाणात ट्रॅव्हल्स धावतात. एसी, नॉन एसी, सीटिंग, स्लीपर गाड्यांच्या तिकिटाचे दर वेगवेगळे आहेत. पुणे, औरंगाबादसाठी एक हजार ते बाराशे रुपयांपर्यंत तिकीट आहे. मात्र, आता गर्दीबघून ते तिकिट तीन हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहे. महिन्यासाठी बुकिंग केले तर ते २५००रु च्या जवळपास तिकीट आकारल्या जात आहे. ट्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात वेटिंग राहत असल्यामुळे ट्रॅव्हल्सला गर्दी वाढल्याचे दिसून येत आहे.प्रवासी सुरक्षा मोठ्या प्रमाणात पुरविल्या जात असल्याचा कांगावा खासगी ट्रॅव्हल्स संचालकांकडून करण्यात येतो. तरीही प्रवासादरम्यान बऱ्याच बॅग चोरीला गेल्याची ओरड प्रवाशांकडून बघायला मिळते. अपघाताची संख्याही अधिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे खासगी वाहनाने प्रवास करताना काळजी प्रवाशांनी काळजी घेणे गरजेचे आहे.

**कुणी तक्रारच करेना**

जर तिकिटाचे दर अधिक घेत असतील आरटीओ कार्यालयात तक्रार करता येते. मात्र कुणी तक्रार करतच नसल्याचे दिसून येते.

**प्रवाशांनो, प्रवासादरम्यान तुम्हीही हे लक्षात ठेवा**

प्रवाशांनी ट्रॅव्हल्समध्ये बसत असताना चालकाने मद्यपान तर केले नाही ना. त्याच्याकडे वाहन परवाना, वाहनाचे फिटनेस, इन्शुरन्स, आपत्कालीन स्थितीत आवश्यक असणारी साधने, बैठक व्यवस्था आदी पाहणी करावी. त्याशिवाय तिकीट काढू नका. आपल्या सुरक्षेची आपणही काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

**बसचा कोळसा झाल्यावरच येतात नियम अन् तपासण्या**

जिल्ह्यात अपघाताची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे. अनेकदा तर नियमांचे उल्लंघन केल्यानंतरच संबंधित विभागाला कारवाईसाठी जाग येत असल्याची ओरड नागरिकांकडून होताना दिसून येते.